पोलीस अधीक्षक, कार्यालय,
हिंगोली महाराष्ट्र, ४३१५१३
E Mail Id - sp.hingoli@gmail .com

दिनांक १५/०८/२०२५

**प्रेस नोट**

# मा.पोलीस अधीक्षक श्री.श्रीकृष्ण कोकाटे यांच्या संकल्पणेतुन स्वातंत्र दिनानिमित्य हिंगोली पोलीस दलाचे विविध समाज उपयोगी उपक्रम

हिंगोली जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.श्रीकृष्ण कोकाटे यांनी हिंगोली जिल्हा पोलीस घटकाचे वतीने समाज उपयोगी व नागरीकांच्या सुख सुविधेसाठी विविध उपक्रम राबवले. ज्यामध्ये नागरीकांना व विशेषत: तरुण पिढीला व्यसनाधिनतेपासुन दुर राहण्यासंदर्भाने संदेश देण्यासाठी **अंमली पदार्थ विरोधी रॅली** चे आयोजन करण्यात आले होते. सदर रॅली ही जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली ते श्री संत नामदेव पोलीस कवायत मैदान, हिंगोली पर्यंत पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. या पदयात्रेला **मा.श्री.नरहरी झिरवळ, पालकमंत्री हिंगोली जिल्हा यांनी हिरवा झेंडा दाखवुन शुभेच्छा दिल्या.** सदर प्रसंगी **मा.आमदार श्री तानाजी मुटकुळे, मा.आमदार श्री संतोष बांगर, मा.आमदार श्री राजु नवघरे तसेच जिल्हाधिकारी श्री राहुल गुप्ता, पोलीस अधीक्षक श्री. श्रीकृष्ण कोकाटे, मा.अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली श्री कमलेश मिना** यांची उपस्थीती होती. सदर पदयात्रेमध्ये भारतीय विदया मंदिर, हिंगोली व श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विदयालय, हिंगोली येथील शिक्षकांनी विदयार्थ्यांसह पदयात्रेमध्ये सहभाग घेतला. तसेच राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १२ हिंगोली येथील १०० जवान व हिंगोली जिल्हा पोलीस घटकातील १०० जवान यांनी पदयात्रेमध्ये सहभाग घेतला. पदयात्रेच्या शेवटी श्री संत नामदेव पोलीस कवायत मैदान, हिंगोली येथे मा.अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली श्री कमलेश मिना यांनी पदयात्रेमध्ये सहभागी झालेल्या विदयार्थ्यांशी संवाद साधुन व्यसनाधिनतेपासुन दुर राहुन एक सशक्त समाज घडवणे बाबत संदेश दिला.

तसेच **महिला, बालक व विदयार्थ्यांना तात्काळ पोलीस मदत** मिळण्यासाठी **निर्भयाचे ०४ पथके स्थापण** करण्यात आले असुन ते विविध शाळा, कॉलेज व गर्दीचे ठिकाणी भेट देवुन महिला, बालक व विदयार्थ्यांची सुरक्षा सुनिश्चीत करणार आहेत.

तसेच वरिष्ठ पोलीस अधिका-यांच्या वतीने श्री संत नामदेव पोलीस कवायत मैदान, हिंगोली येथे **वृक्षारोपन करून ११०० झाडे लावण्याचा उदिष्ट ठेवला आहे.** सदर वृक्षारोपन कार्यक्रमात मा.अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली श्री कमलेश मिना, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अबादास भुसारे, श्री दत्ता केंद्रे, प्र.पोलीस उप अधीक्षक (गृह), हिंगोली, पो.नि.श्री मोहन भोसले, स्था.गु.शा. हिंगोली, पो.नि. श्री बद्रिनाथ सानप, जि.वि.शा.हिंगोली, रापोउपनि.श्री बाबुराव जाधव, रापोउपनि.श्री अ.अखील जब्बार,पोलीस मुख्यालय, हिंगोली तसेच राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १२ हिंगोली चे पो.नि.श्री. सोनवणे यांनी संत नामदेव पोलीस कवायत मैदान, हिंगोली येथे वृक्षारोपन केले.

तसेच हिंगोली पोलीस दलातील **पोलीस उपनिरीक्षक एकनाथ ग्यानोजी डक**, ने. पो.स्टे. वसमत ग्रामीण व **पोलीस अंमलदार दत्तात्रय प्रल्हाद नागरे**, ने. सायबर सेल, हिंगोली यांनी नक्षलग्रस्त भागात दोन वर्ष सेवा यशस्वीरीत्या पुर्ण केल्यामुळे त्यांना मा.पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांच्यावतीने **विशेष सेवा पदक** जाहिर झाल्यासंदर्भाने पोलीस अधीक्षक श्री.श्रीकृष्ण कोकाटे यांच्या हस्ते विशेष सेवा पदक देवुन सन्मानित करण्यात आले. तसेच नमुद अधिकारी व अंमलदार यांना मा.श्री.नरहरी झिरवळ, पालकमंत्री हिंगोली जिल्हा यांचेहस्ते प्रशस्ती पत्र देवुन सन्मान करण्यात आला.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली


दबाव म्हणजे
मैत्री नाही
पदकं जिंका ,
व्यसन नाही
तुमची ताकद खेळासाठी वापरा,
नशेसाठी नाही.
ताकदीने खेळा, निर्व्यसनी राहा.
भव्य किर्तन सोहळा


NO TO DRUGS


DRUGS
IPS



